
श्री छत्रपति

# * शिवाजी महाराज *



म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वी.
दा. क्र. ३७०
BVBK-0400370

॥ श्री ॥

# छत्रपती शिवाजी


लेखक :

गोपाळ नीलकण्ठ दाण्डेकर



BVBK-0400370

[redacted]

किमत ८० पैसे

350

बा.वा.



ग्रंथप्रकाशक व ग्रंथविक्रेते

**श्रीराम प्रकाशन**

ठाकुरद्वार, मुंबई क्र. २




प्रकाशिका :
सौ. शैलजा भावे
श्रीराम प्रकाशन,
ठाकुरद्वार, मुंबई २.

स्वातंत्र्यदिन
१५।८।७५

मुद्रक :
अ. चिं. रायरीकर
स्वस्तिक मुद्रणालय,
४३९ शनिवार पेठ, पुणे ३०

# छत्रपती शिवाजी

ऐका माझ्या इटुकल्या मित्रांनो ! आपल्या शिवाजी-राजाची कथा : ती कथा वाचताच तुमच्या इवलाल्या छात्या दोन दोन बोटं उंचावतील.

आपला हा महाराष्ट्र देश. सह्याद्रीचा देश. मराठ्यांचा देश. ज्वारीचा, बाजरीचा, भाताचा, नारळांचा, पोफळांचा देश. इथले लोक नारळासारखे दिसायला खडबडीत पण आत मऊ खोबरं. मरणाशी झुंजतील. मागं म्हणून सरायचे नाहीत. पण आपल्या जिवाभावाचा माणूस भेटला म्हणजे?

म्हणजे मग त्याच्यासाठी प्राणसुद्धा देतील. एवढासाही विचार करायचे नाहीत. मरणाला न हटणारे, मरहट्टे, मराठे.

पण काय झालं ? बरं का, हे मराठे आपल्यातच भांडत बसले. जेधे बांदलांशी भांडताहेत, कंक मालुसऱ्यांशी, खोपडे मान्यांशी, मोरे शिर्क्यांशी भांडताहेत. साडेतीनशे वर्षं झाली या गोष्टीला. या आपसातल्या भांडणामुळं काय झालं ?

अगदी वाईट झालं. परके लोक आपल्या देशात आले. अन् राजे होऊन बसले ! एक नव्हे, पाच पाच बादशहा ! आदिलशाही, बुऱ्हाणशाही, बेदरशाही, निजामशाही, कुतुबशाही !

अन् मग या परक्या लोकांचा वरवंटा फिरायला लागला आपल्यावरून ! कुण्याही फाटक्या खानानं घोड्यावर बसून यावं. कमरेला तरवार, पाठीशी ढाल, कुण्याही बादशहाचं नाव सांगावं. अन् मग काय वाटेल ते न्यावं ! पैका, धान्य,

गुरं, ढोरं, वैरणकाडी, दूधदुभतं, कोंबड्या, बकऱ्या अन् आमच्या आयाबहिणीसुद्धा ! सुनालेकीसुद्धा !

आपले मराठे नुसते टकमक पाहात राहायचे, चिडायचे. चरफडायचे. अन् शेवटी दात खात स्वस्थ बसायचे !

पण अन्याय फार दिवस चालत नाही.

शेवटी एक चिमणा एका आईच्या कुशीत जन्माला आला. त्यानं हे सगळं पाह्यलंन्, संतापानं ओठ चावलेन्, त्यानं ठरवलंन्–

" हा आमचा देश. माझा. "

" इथं नाही दुसऱ्याला दिमाख मिरवू द्यायचा मी. "

" काय वाटेल ते करीन. रानावनात हिंडेन. गडी-सौंगडी गोळा करीन. त्यांची मनं जागी करीन. "

" अन् मग त्या सगळ्यांना घेऊन हा देश पुन्हा एकदा स्वतंत्र करीन. येथले किल्ले, गढ्या, कोट या सगळ्यांवर निशाण फडकवीन ! "

त्याचं नाव शिवाजीराजा ! श्रीछत्रपती श्रीशिवराय !

## शिवनेरी किल्ल्यावर

शिवनेरी किल्ला. माहीत आहे तुम्हाला कुठं आहे तो?

जुन्नरजवळ आहे. पुणे जिल्ह्यात. जमलं तर पाहून या एकदा. त्या किल्ल्यावर एक देवीचं देऊळ आहे. तिचं नाव शिवाई.

त्या किल्ल्यावर शके १५४९ मध्ये एक आई मुक्कामाला आली. मोठी पतिव्रता. साध्वी. तिला लवकरच बाळ व्हायचं होतं. नाव काय तिचं ?

तिचं नाव जिजाबाई! आदिलशहाचे सेनापती शहाजी राजे भोसले यांची पत्नी. शहाजीराजे लढाईच्या धावपळीत गुंतले होते म्हणून त्यांनी जिजामाउलीला शिवनेरीवर पाठविलं.

किल्ला चढतानाच ती शिवाई देवीच्या देवळात थांबली. तिनं भक्तिभावानं हात जोडले. अन् म्हणाली–

" माता माउली! आता या तुझ्या देशाची लाज तुला!"

" या तुझ्या लेकीबाळी धाई धाई रडताहेत? अन् तू अशी त्यांची गंमत पाहात उभी राहशील? त्यांच्यासाठी काहीच करणार नाहीस?"

" या सगळ्या वाट पाहाताहेत. तू कुणींतरी आपला भक्त धाडशील यांच्या सोडवणुकीसाठी?"

" धाड! आई! पाठव ग कुणी तरी!"

मग ती किल्ल्यावर चढून गेली.

वैशाखाची शुद्ध पक्षातली द्वितीया उजाडली. त्या दिवशी काय झालं? जिजामाउलीला एक गोजिरवाणं बाळ झालं! तिच्या डोळ्यांत आसवं उभीं राहिली. तिला वाटलं, हा शिवाई देवीचा प्रसाद आहे. तिनं आपला हा पुत्र धाडला आहे, आयाबहिणींच्या हाकेला ओ देण्यासाठी.

मग तिनं त्या लेकराचं नाव ठेवलंन् शिवाजी! शिवाई देवीनं दिलेला म्हणून शिवाजी!

बाळ हळू हळू वाढायला लागलं शिवनेरी किल्ल्यावर. मावळावरून वाहणारी हवा. गंगाजमना टाक्याचं पाणी. इथल्या गाईगुजीचे दूध. मावळात पिकणारं भात. हे सगळं मिळालं बाळाला. या सगळ्यांनी सांगितलं त्याला——

"बाळ ! मोठा हो ! आमचे पांग फेड !"

## बाळपणीचे खेळ

जिजामाउलीनं शिवरायाभोवती जिवाभावाची माणसं ठेवली. पारखून निरखून सौंगडी मिळविले. अन् मग ती लेकरं खेळायला लागली.

शिवबा लहानपणापासून मोठा बुद्धिमान, चपळ, एकपाठ्या. वाड्यात असलेल्या मैना अन् पोपटाची तो बरोबर नक्कल करी. वाघासारखे ओरडे, तेव्हा लोकांना वाटे की खरोखरचाच वाघ आलाय् ! कधी एखाद्या गोंधळ्याच्या नाही तर वासुदेवाच्या पोराचंच सोंग घेऊन येई शिवबा. अगदी आईलासुद्धा ओळखू यायचा नाही तो.

शिवाजी अन् पोरं खेळायची, ते सुद्धा किल्ल्यांचे खेळ. दगडामातीचे किल्ले करायचे. अन् मग ते जिंकायचे. मारामाऱ्या करायच्या. घोड्यावर बसायचं. तरवार फिरवायची. भाला फेकायचा. पट्टा चालवायचा. कुस्ती खेळायची. हाताला लागायचं. गुडघे फुटायचे. कपाळावर खोका पडायच्या.

पण शिवबाला त्याचं काहीसुद्धा वाटायचं नाही. तो आपला हसायचा. अन् जिजामाउली ? ती कौतुक करायची.

मग तिनं शिवबाला गोष्टी सांगाव्या. रामायण अन् महाभारतातल्या. सीतामाई रावणानं पळवली, आपली सीतामाई. या देशाची माउली. रामराय रावणावर चालून गेले. रावणाजवळ होतं खूप सैन्य, शस्त्रं, अस्त्रं. रामाजवळ होते वानर अन् अस्वलं!

पण राम अडून का बसले ! मुळीच नाही. तेवढंच सैन्य घेऊन त्यांनी रावणावर हल्ला केला. खूप मोठं युद्ध झालं. शेवटी रावण मेला. सीतामाईची सुटका केली रामरायांनी.

ती कथा जिजामाउलींनं शिवबाला सांगावी. शिवबानं मन लावून ऐकावी. मग जिजामातेनं सुरू करावं महाभारत. अर्जुनाची कथा, कर्णाची, भीष्माची, अभिमन्यूची, भीमाची, श्रीकृष्णाची, द्रोणांची, किती तरी गोष्टी. त्या सगळ्या तिनं शिवबाला सांगितल्या. शिवबानं त्या ऐकल्या. मनात साठवल्या.

मग त्यानं ठरवलं. रामानं सीतामाईला सोडवलं. आपण या आपल्या जन्मभूमीला सोडवायचं. पांडवांनी कौरवांशी लढून आपलं राज्य परत घेतलं, आपण या परक्यांशी लढून आपला देश पुन्हा स्वतंत्र करायचा.

जिजाबाईला एका म्हाताऱ्या ब्राह्मणाची खूप मदत झाली या कामात. त्याचं नाव दादोजी कोंडदेव.

## दादोजी कोंडदेव

शहाजीराजांचा दादोजीवर खूप विश्वास. त्यांनी पुण्याची जहागीर दादोजीकडे सोपवली होती. दादोजी लाख किंमतीचा माणूस. मोठ्या दानतीचा. एकदा त्यानं चुकून धन्याच्या आंबराईतला एक आंबा तोडला. मग खूप वाईट वाटलं. हात तोडायला निघाला म्हातारा. जवळच्या माणसांनी समजावलं तेव्हा कुठं शांत झाले दादोजी. तरी त्यांनी आपल्या कुडत्याच्या हाताची बाही जन्मभर तोकडी ठेवली. असा दाणा माणूस.

त्यांनी जहागिरीचा बंदोबस्त अगदी चोख ठेवला होता. त्यांनी भाऊबंदकीची भांडणं तोडली. मावळ्यांची पलटण तयार केली. अशा रीतीनं त्यांनी जमीन अगदी नांगरून तयार ठेवली. शिवबाकरिता त्यांनी पुण्याला एक वाडा बांधला. त्यात जिजामाउली अन् शिवबा राहायला लागली. पुण्याला राहायला आल्यावर शिवबा दादोजींच्या बरोबर जहागिरीत फिरायला जात.

कधी घोड्यावर, कधी पालखीत, कधी पायी, असे खूप हिंडले शिवबा. त्यांनी जहागिरीतील किल्ले, डोंगर, नद्या, कडे, कपारी हे सगळं पाहिलं. दऱ्याखोऱ्यांतून राहणारे दरिद्री मावळे. पण मनानं श्रीमंत. त्या मावळ्यांशी दोस्ती केली. जिवाभावाचे सोबती जोडले. त्या मावळ्यांना वाटायला लागलं–' अरे वा ! शिवबा खूप चांगला ! कित्ती कित्ती चांगला ! याच्यावरून प्राण ओवाळून टाकावे !'

## विजापूर

शहाजीराजांनी जिजामाउलीला शिवबाला घेऊन विजापूरला बोलावलं. दहा वर्षांचे शिवबा. एवढीशी मूर्ती. पण देखणा. शहाजीराजे दरबारात बरोबर घेऊन गेले. पातशहाला मुजरा करून ते शिवबाला म्हणाले, " बेटा ! मुजरा कर पातशहांना !"

तो चिमणा वीर, ताठ उभा राहिला. क्षणभर पाहिलंन् पातशहाकडे नजर भिडवून, मग म्हणाला–

" कुणाला मुजरा करू बाबा ?"

" पातशहांना !"

मी मुजरा करतो जगदंबेला, जिजामातेला, तुम्हाला. आणखी कुणाला मुजरा करायची संवय नाही मला!'

पातशहा हसला. म्हणाला, "राहू द्या शहाजीराजे. बच्चा आहे मोठा तिखट! हुशार आहे!"

शिवबा म्हणाला, "बाबा, मला बरं वाटत नाही. मी जातो परत!"



निघाला शिवबा वाड्याकडे. वाटेत एका ठिकाणी एक

कसाई दिसला त्याला. एका गाईला फराफरा ओढीत चालवलं होतंन् त्यानं. कशाला? कापायला. गाईमागं तिचं वासरू–गोजिरवाणं–ते धावत होतं. हंबरत होतं. आईच्या आंचळात तोंड घालीत होतं.

शिवाजीनं हे पाहिलंन्. कसायानं भर चौकात गाय थांबवली. ती येईना त्याच्यामागं,म्हणून चिडला तो. त्यानं तिथंच सुरा काढलान् बाहेर. तेवढ्यात––

तेवढ्यात त्याचा हात खालीच उतरला! मागं शिवबा संतापानं थरथरत उभा होता. हातीं होती नागवी तलवार. रक्त निथळतंय् तिच्यावरून!

संध्याकाळी शहाजीराजे आल्यावर शिवबा म्हणाला,

"बाबा! मी अन् मासाहेब दोघं जातो पुण्याला!"

"जाता? जा."

# रोहिडेश्वरी शपथ

शिवबा परतला. नवा हुरूप घेऊन. मासाहेबांनी धीर दिला. दादोजी पाठीशी उभे राहिले. युक्तीयुक्तीने कोंडाणा किल्ला ताब्यात घेतला. कोंडाणा म्हणजे सिंहगड. त्याच्या पलीकडे तोरणा किल्ला. भला मजबूत. खूप उंच. एका रात्री शिवबा दहावीस सौंगडी घेऊन तोरण्याच्या पायथ्याशी गेला. किल्लेदार भेटायला खाली आला. पुण्याचे जहागिरदार आले आपल्या घरी. मग भेटायला नको?

कोण जाणे काय बोलणी झाली त्या दोघांची! सकाळी लोकांनी पाहिलं. आदिलशहाचं हिरवं निशाण खाली उतरलं अन् शिवरायाचं भगवं निशाण फडकायला लागलं!

मुहूर्त तर चांगला झाला. एकेक किल्ला हाती येतोय्. एकेक तालेवार गडी–सौंगडी येऊन मिळतोय्. पण या सगळ्यांना एका शपथेत बांधलं पाहिजे. एका व्रतात गुंतवलं पाहिजे.

सन १६४५ चा मार्च महिना. रायगडाच्या पलीकडे सह्याद्रीचा एक सुळका आहे. रोहिडेश्वर त्याचं नाव. तिथं शंभुमहादेवाचं देऊळ. सह्याद्रीचा राजा शंभुमहादेव. त्या देवळात एका सकाळी लोक जमलेय्त. त्या लोकांत कोण कोण आहेत ? त्यांच्यात तरणाबांड शिवबा आहे. तानाजी मालुसरे आहे. येसाजी कंक आहे. बाजी पासलकर आहे. गोमाजी नाईक आहे. कान्होजी जेधे आहे. अन् या सगळ्यांना आशीर्वाद द्यायला म्हातारे दादोजी कोंडदेव आहेत.

सगळ्यांनी स्नानं केली. बेलभंडार उचलला. देवळात गेले. शिवबानं तरवार दोन्ही हातांत धरली. महादेवापुढं मस्तक नमवलं. अन् तो म्हणाला,

" शंभुमहादेवा ! तू डोंगर शिखराचा राजा !
" तुझ्या साक्षीनं आम्ही शपथ घेतो.
" आमचा देश आज परतंत्र आहे.
" आमच्या देशात आम्ही गुलाम आहोत.
" हे आम्हाला सहन होत नाही.
" आजपासून आम्ही तरवार उपसली.
" गोरगरिबांच्या कल्याणासाठी–
" मायमाउलींच्या रक्षणासाठी–
" गोमातेच्या पालनासाठी–

" याचा साक्षीदार तू !

" जय शंभुमहादेव ! जय भवानी !"

सगळ्यांचे बाहू फुरफुरले. शिवबाच्या मागोमाग त्या सगळ्यांनी शपथा घेतल्या. शेवटी दादोजी डोळ्यांतली आसवं पुशीत म्हणाले, " बाळांनो ! मी म्हातारा माणूस. हातून दुसरं काही व्हायचं नाही. पण शंभुमहादेवाजवळ असं मागणं मागेन–" तुमची ही प्रतिज्ञा शेवटास जावो."

## पुरंदर

पुण्याजवळ पुरंदरचा किल्ला. मोठा सुरेख. खूप कठीण. पण तो दुसऱ्याच्या ताब्यात. किल्लेदाराचे नाव नीळकंठराव नायकवडी. तो धड ना आदिलशाहीचा सरदार, ना निजामशाहीचा. भोवतालच्या टापूतली खंडणी वसूल करायचा अन् आपला गडावर मजा करायचा. शहाजी राजांची अन् त्याची दोस्ती.

मग शिवाजीराजे बरोबर हजार दोन हजार मावळे घेऊन निघाले. पुरंदराखाली आले. वर निरोप धाडला,

" तुम्ही आमच्या वडिलांचे स्नेही. तुमच्या किल्ल्याच्या आसऱ्याला चार दिवस राहू म्हणतो. "

किल्लेदार म्हणाला, " राहा. "

मग शिवाजीराजे तिथं राहिले. किल्लेदाराचा धाकटा भाऊ शंकराजी. तो राजांचा मैतर. त्याच्या अन् राजांच्या खूप गोष्टी होत. तशात दिवाळी आली. पाडव्याच्या दिवशी किल्लेदारानं भावाला वर बोलावलंन्. भाऊ म्हणाला,

" राजांना टाकून मी एकटा कसा येऊ ? "

मग राजांनाही बोलावलं. राजे किल्ल्यावर आले. त्या रात्री राजांनी किल्लेदारांना भेटीला बोलावलं. इकडे आपल्या माणसांना गुपचुप सांगून ठेवलं होतं त्यांनी. किल्लेदार आल्यावर राजे म्हणाले, " तुम्ही म्हातारी माणसं. किल्ला कसा सांभाळाल ? "

" मग ? "

" आम्ही सांभाळतो. "

किल्लेदार पाहतात तो गडावर सगळ्या शिवाजीराजांच्या चौक्या ! सगळे त्यांचे पहारे ! मग काय करतो बिचारा! पण शिवाजीराजांनी त्याला शेलापागोटं दिलं. इनाम दिलं. गडाखाली ठेवलं. असा पुरंदर फत्ते झाला.

## जावळीची मसलत

प्रतापगडाजवळ जावळी खोरं. मोठा कठीण मुलुख. खूप रान, दऱ्या, खोरी. घोडेस्वार आत शिरला तर त्याला धड बाहेर निघता यायचं नाही. तिथे मोऱ्यांचा अंमल. ते आपल्याला राजे म्हणवायचे. शिवबांनी त्यांना गोडीगुलाबीचं पत्र लिहिलं. पण ते कसले जुमानताहेत ! त्यांनी उत्तर धाडलं : " तू कशाचा राजा ! राजे आम्ही. श्रीमहाबळेश्वरानं आम्हाला राज्य दिलं. तू राजा म्हणवू नकोस. ही जावळी आहे. येताना जावळी, जाताना गोवली. या कोकणचे राजे आम्ही. तू तिकडे पुंडपणा कर. इकडे येशील तर लक्षात ठेव ! "

आता काय करायचं ? मग शिवबानं मसलत केली. संभाजी कावजी मोठा फाकडा लढवय्या. त्याच्याबरोबर

सिलीमकर, बांदल, कान्होजी जेध अशी मंडळी दिली. अन् सैन्य देऊन त्यांना जावळीवर धाडलं. लढाई झाली. मोरे गारद झाले. जावळी शिवरायाच्या हाती आली. मग त्यांनी रायगडही घेतला.

शिवरायांनी पाहिलं. हे जावळी खोरं मोठी फाकडी जागा. इथं एखादा किल्ला पाहिजे. म्हणून त्यांनी मोरो-पंतांना आज्ञा केली. पंतांनी एक उंच डोंगर हेरला, छान मोक्याच्या जागी. तिथं किल्ला बांधला. प्रतापगड त्याचं नाव. शिवरायांनी त्यावर जगदंबेची स्थापना केली. मोठा सुंदर आहे प्रतापगड.

## अफझलखान कापला

शिवबाचं राज्य वाढायला लागलं प्रतिपदेच्या चंद्रकोरी-सारखं. पण ते काही लोकांना बघवेना. विजापुरी आदिल-शाहाच्या पोटात लागलं दुखायला. त्याला वाटलं, आता कसं होणार? हा तर आपल्या राज्याचा घासच घ्यायला उठला!

विजापूर दरबारी एक सरदार होता. अफजुल्ला त्याचं नाव. चार हात उंच, दोन हात जाड. एक बकरा जेवणाला लागायचा त्याला. जसा काही राक्षस! त्याला वजिरानं विचारलं, "आता कसं करायचं? शिवाजीचा पुंडावा तर वाढत चालला. खान माजोरीपणानं म्हणाला, "शिवाजी शिवाजी काय चीज! डोंगरातला उंदीर! मानगूट धरून पकडून आणतो. मेलेला तरी, नाही तर जिवंत तरी!" मग बारा हजार हत्यारबंद फौज घेतली बरोबर, अन् खान निघाला. वाटेत त्यानं काय काय केलं?

पंढरीचा विठोबा, त्याचे धिडवडे काढले. तुळजापुरची भवानी, तिचं पीठ केलं. शिंगणापुरचा महादेव, त्याची परवड केली, औंधची यमाई, तिची चेष्टा केली. पालीचा खंडोबा, त्याची दैना केली.

शिवबानं हे ऐकलं. त्यानं ठरवलं, खानाला जावळीच्या रानात गाठायचं. म्हणून त्यानं प्रतापगडावर मुक्काम केला. म्हणून मग खानही वाईला आला. त्यानं वाईहून कृष्णाजी भास्कर शिवरायाकडे धाडला. त्यानं सांगितलं,

" तुम्हाला खानानं वाईला बोलावलं आहे."

पण शिवबा मोठा हुशार. तो कृष्णाजी भास्कराच्या पोटात शिरला. त्यानं खानाचा बेत समजून घेतला. मग शिवरायानं आपला वकील पंताजी गोपीनाथ खानाकडे धाडला. त्यानं खानाला हात जोडून सांगितलं, " शिवाजी राजे म्हणतात, आपण शहाजीराजांचे दोस्त. मी आपल्या मुलासारखा. चुकी झाली. माफी करा. मला एवढ्या मोठ्या सेनेची भीती वाटते. आपणच प्रतापगडाजवळ याल तर बरं होईल !"

" ठीक आहे."

भेटीची तयारी सुरू झाली. प्रतापगडच्या पायथ्याशी मांडव घातला. खूप सजवला तो. किनखापी छप्पर. भरजरी झालरी. हंड्या. झुंबरं. वेळ ठरली. खानानं मार्गशीर्ष शु. ७ ला प्रतापगडाखाली यायचं.

त्या दिवशी सकाळी शिवराय उठले. स्नान झालं. देवपूजा झाली. त्यांनी देवीचं दर्शन घेतलं. मासाहेबांना नमस्कार केला. त्यांनी डोळ्यांतली आसवं पुशीत आशीर्वाद दिला. शिवराय निघाले. बरोबर होता जिऊ महाला.



खान मोठ्या डौलानं फौज घेऊन चालला भेटीला. पंताजी

गोपीनाथ म्हणाला, " फौजेला राजे भितात !'

खानानं हसून फौज मागं ठेवली. सय्यद बंडा बरोबर घेतला. बैठकीच्या जागी आला. राजे आले. खान पुढं झाला. दोघांनी एकमेकांला मिठी मारली. पण–पण खानाच्या पोटात होतं कपट. त्यानं शिवरायाला बगलेत आवळून धरलं, अन् पोटात जमदाड चालवली ! शिवरायांनी चिलखत घातलं होतं म्हणून बरं झालं !

मग शिवरायांनीही खानाच्या पोटात वाघनखं खुपसली. कोथळा बाहेर काढला ! खान ओरडला–" दगा ! दगा! "

त्यानं शिवरायांच्या डोक्यावर वार केला. पण शिवरायांनी शिरस्त्राण घातलं होतं ! त्यांनी एका घावात खानाला थेट पोटापर्यंत कापलं ! सय्यद बंडा राजांवर धावला. जिऊ महाल्यानं त्याचा काटा काढला ! खानाचे भोई खानाचा मुडदा पालखीत घेऊन निघाले. पण संभाजी कावजीनं खानाचं मुंडकं कापलं, अन् ते घेऊन मंडळी परतली !

खानाची फौज होती. तिचा फज्जा नेताजी पालकर अन् मोरोपंत पिंगळ्यांनी उडवला ! खूप लूट मिळाली !

वर येऊन शिवरायांनी मासाहेबांच्या पायांवर डोकं ठेवलं !

## पावनखिंड

कोल्हापुराजवळ पन्हाळगड नावाचा किल्ला. खूप मजबूत. खूप जुना. शिवरायानं अण्णाजी दत्तोला धाडलं तो

घेण्यासाठी. काम फत्ते झालं. शिवरायानं स्वतः पन्हाळ्यावर जाऊन किल्ला पाहिला. खूप मजबुती केली. चौक्या, पहारे कडेकोट बंदोबस्त.

अफजुल्ला मेला, हे विजापूर दरबारला कळलं. नुसता चडफडाट झाला ! छे छे छे ! हे तर अनावर काम झालं! वजीर दाढी उपटायला लागला. पण सिद्दी जौहर नावाचा सरदार.तो उभा राहिला. म्हणाला, "मी काम फत्ते करतो!" पातशहानं त्याच्या गळ्यात मोत्याचा कंठा घातला. अफजुल्ल्याचा मुलगा फाजलखान. तो दिला बरोबर.

मग सिद्दी जौहर, फाजलखान, रुस्तुमजमान, बाजी घोरपडे असे विजापुऱ्ये सरदार निघाले दात खात. त्यांनी ऐकलं, शिवबा पन्हाळगडावर आहे. लगेच सगळी फौज त्यांनी पन्हाळगडावर भिडवली !

पन्हाळगडाला वेढा पडला. कडेकोट बंदोबस्त. मुंगी काही आत-बाहेर जात येत नाही. शिवरायानं विचार केला, हे काही बरं नाही. एक्या जागी कोंडून काय पडायचं ? बाहेर निघालं पाहिजे. म्हणजे मग यांचा फज्जा उडवता येईल.

त्यांनी वकील पाठवला. " किल्ला तुमच्या हाती देतो. मी तुमच्या स्वाधीन होतो. म्हणाल तिकडे येतो."

सिद्दी जौहर हुरळला. सैनिक म्हणाले,

" संपली लढाई ! आता मजाच मजा !"

पण शिवरायांनी दिली वंचिका. सैनिक गाफील आहेत असं पाहिलं त्यांनी ! अन् हजार मावळ्यांनिशी रात्रीच्या

अंधारात निसटले ! दिली हातावर तुरी ! विशाळगडाकडे चालले. बरोबर होते बाजी प्रभू.

खूप वेळानं विजापुऱ्ये सरदार जागे झाले. डोळे चोळीत ते चरफडले, " शिव्या भाग गया ! "

मग लागले शिवबाच्या मागं धावायला ! घोडे अन् उंट, असं सैन्य घेऊन सिद्दी मसूद अन् फाजलखान दोघे पळताहेत शिवबाचा तपा्स काढीत ! शिवबा विशाळगडाची चढण चढत होते. त्यांना शत्रूचं सैन्य दिसलं. ते उभे राहिले, म्हणाले, " बाजी ? आता कसं ?"

" काही नाही महाराज ? तुम्ही चला पुढं ! मी थांबतो."

" कुठपर्यंत ? "

" तुम्ही सांगाल तिथपर्यंत. "

" मी किल्ल्यावर पोचून तोफांचे पाच आवाज काढतो, तोपर्यंत ? "

" हो महाराज ! तोपावेतो काय वाटेल ते करीन, पण मुसलमानाकडील एक कोंबडी काही वर चढू द्यायचा नाही ! "

काही मावळे घेऊन मर्द बाजी प्रभू तिथंच राहिला !

विजापुऱ्ये सरदार येऊन भिडले. बिशाद एक माणूस पुढं सरेल ! खिंडीत उभा आहे बाजी प्रभू ! दोन्ही हातांनी तरवारी चालवीत तो म्हणाला,

" भले रे बहाद्दर ! चालू द्या हात ! आपण वचन दिलंय् आपल्या राजाला ! "

मावळे होते थोडे. मुसलमान होते पुष्कळ. त्यांचा जोर झाला जास्त. मावळे एकेक एकेक लढता लढता पडले धरणीवर !

दुपारी फाजलखान स्वतः आला. बाजी प्रभूच्या अंगावर वार लागले दहा-पाच, तरी दात खाऊन तो म्हणाला,

" नाही वर जाऊ द्यायचा मी तुला ! अजून तोफांचे आवाज झाले नाहीत ! "

फाजलखानानं गोळी घातली. ती बाजी प्रभूच्या छातीत घेऊन लागली. तो खाली पडत ओरडला, " महाराज ! "

तेवढ्यात तोफांचे पाच बार ऐकू आले !

बाजीच्या डोळ्यांत आसवं उभी राहिली. गद्‌गदून तो म्हणाला, " मी माझं काम केलं बरं का महाराज ! "

संपलं संपलं ! पण मावळे गडी शर्थीचे ! त्यांनी बाजीचं प्रेत हातोहात गडावर पोचतं केलं ! राजांनी ते पाहिलं, तशी कळवळून म्हणाले, " शाबास रे माझा बाजी ! "

## सिंहाच्या गुहेत

नुसत्या विजापूरशी झुंजून काय होतंय् ! दिल्लीला औरंगजेबही बसला होताच की मिशा पिंजारीत नि दाढी गोंजारीत ! औरंगाबादला औरंगजेबाचं ठाणं होतं. जेव्हा त्यानं शिवरायाचं बळ वाढताना पाहिलं, तेव्हा त्यानं आपला मामा धाडलान् दक्षिणेत. शाएस्तेखान त्याचं नाव. म्हातारा माणूस. बरोबर खूप मोठं लावलष्कर. हत्ती, घोडे, उंट, तोफा, जेजाला, गरनाळा असा थाट.

शाएस्तेखान निघाला धडका देत. चाकणला फिरंगोजी नरसाळा शिवरायाचा किल्लेदार. मोठा उमदा माणूस.

खानानं चाकणला वेढा दिला. फिरंगोजीनं शर्थीनं चाकण झुंजवलंन् पण शेवटी खानानं घेतलान् किल्ला. फिरंगोजीला पकडलं. खान म्हणाला, "शाबास रे वाघा ! खूप झुंजलास. बादशहाच्या नोकरीत येतोस का?" "मी एका शिवाजीराजाला ओळखतो. दुसरा कुणी पाच्छा मला नाही माहीत."

शाएस्तेखान खूष झाला. त्यानं फिरंगोजीला शिवरायाकडे धाडलंन् मग तो पुण्याकडे निघाला. तिथं शिवरायाचा लाल महाल. त्यात खानानं मुक्काम केला.

राजाचं तुळशीवृंदावन होतं, तिथं मांसमच्छी शिजायला लागली. देवघर होतं, तिथं नाच गाणी व्हायला लागली. व्यायामाची जागा होती, तिथं खानाची माणसं दारू पिऊन धिंगाणा घालायला लागली. शिवरायांना हे सगळं कळलं. त्यांनी ठरवलं, की सिंहाच्या गुहेत शिरलाय खान. त्याला चांगला धडा शिकवायला हवा.

खानानं पुण्याभोवती कडेकोट बंदोबस्त केला. कुणाला म्हणून परवानगीवाचून आत शिरता येईना ! पण शिवराय कसले युक्तिबाज ! सिंहगडावरून रात्र झाल्यावर ते निघाले. बरोबर चारशे मावळे. चौकीवाल्यांनी अडवले. पण त्यांनी मुसलमानी भाषेत सांगितले, "पहारेवाले हैं! खानके आदमी !"

शिरले शहरात. एक शब्दसुद्धा कुणी बोललं नाही. रात्री बारा वाजले. लाल महाल शिवरायाच्या ओळखीचा. लहानपणी खूप खेळलेले. मागच्या भिंतीला एक भोक पाडलं. त्यातून आत शिरले. पहारेकरी पेंगत होते. त्यांना कापून काढलं.

मग काय! एकच ओरडा झाला. मारा ! ठोका ! त्या धांदलीत खानाचा बेटा जनानखान्यातून बाहेर आला. त्याचं डोकं उडवलं. खान झोपला होता. तो जागा झाला. तेवढ्यात शिवबा शिरले त्याच्या खोलीत ! तरवार उचलली त्यांनी. खान खिडकीतून उडी मारून पळून जायला लागला. त्याच्या हातावर शिवबांचा वार बसला. खानाची बोटं तुटली.

शिवराय लगोलग बाहेर पडले नि सिंहगडाकडे पसार झाले !

मग खानाचं सैन्य डोळे चोळीत उठलं; त्यांना कात्रजच्या घाटात दिसल्या मशाली. तरवारी परजीत तिकडे धावले. पाहतात तो काय ! दहावीस बैलांच्या शिंगांना अन् झाडांना मशाली बांधल्या आहेत ! अशी त्यांची फजिती झाली.

## सुरतेची बेसुरत

शिवबानं ठरवलं, की एवढ्यानं नाही भागायचं. औरंगजेबाला आणखी एक धडा शिकवायचा. सुरत मोठं बंदर. तिथं मोठा व्यापार. ते दिल्लीकरांच्या ताब्यात. त्याच्यावर छापा घालायचा. ते लुटून आणायचं. शिवबानं बरोबर चार हजार मोजके मावळे घेतले. नाशिकला जातो अशी हूल उठवली. अन् एक दिवशी सकाळी आपला सुरतेजवळ हजर. सुरतकरांना कसलीसुद्धा खबर नव्हती ! पण शिवाजीराजाला पाहिलं अन् मग मात्र झाली पळापळ सुरू. सुरतेचा सुभेदार तटात जाऊन लपला. शिवरायानं पत्र धाडलंन् :

" मी तुम्हाला मुळीच त्रास द्यायचा नाही. बादशहानं दख्खन लुटली. मला सुरतेकडून पैसे हवेत. तेवढे द्या. मी जातो. "

सुरतेत खूप श्रीमंत व्यापारी राहायचे. एकेकाच्या घरी मण मण मोत्ये. पण कुणी काही उत्तर पाठवलं नाही. सुभेदाराचं उत्तर आलं : " तुम्ही परत जाता की मार खायचाय ? "

मग मावळे सुरतेत शिरले. त्यांनी व्यापाऱ्यांच्या घरांवर धाडी घातल्या. तेवढ्यात सुभेदाराचा एक माणूस शिवराया-कडे आला. अन् म्हणाला, " सुभेदारांचा निरोप आहे. कानात सांगायचाय्. "

अगदी जवळ आला तो, अन् शिवरायाच्या छातीत खंजीर मारलान्! लगेच त्याचं डोकं उडवलंन् एका माव-ळ्यानं. मग मात्र मावळे चवताळले. त्यांनी जाळपोळ सुरू केली. चार दिवसपर्यंत सुरत लुटत होते मराठे. खंडोगणती सोनं, रुपं, चांदी, जवाहीर, मोत्ये अशी लूट मिळाली !

अशी सुरतेची बदसुरत केली शिवरायानं, अन् पाखरा-सारखा जो उडाला, तो रायगडावर !

## जयसिंहाला पत्र

औरंगजेबानं हे ऐकलंन्. तेव्हा दाढीचे केस उपटलेन् त्यानं. त्याच्या पदरी एक मोठा पराक्रमी सरदार होता. जयसिंग त्याचं नाव. जातीचा रजपूत. नुसता पराक्रमीच नाही. मोठा धोरणी, मोठा हुषार !

त्याला औरंगजेबानं दक्षिणेत धाडायचं ठरवलंन्. त्याच्या मदतीला दिला दिलेरखान पठाण.

अन् मग खूप मोठं प्रचंड सैन्य घेऊन जयसिंह दक्षिणेत निघाला. आल्याबरोबर त्यानं चहूं बाजूंनी कोंडी केली. पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर–चारी दिशांनी त्यानं शिवरायाला घेरलं. चाकण घेतलाच होता. लोहगड घेतला, राजमाची घेतला, अन् पुरंदरला वेढा घातला. पुरंदरला मुरारबाजी किल्लेदार. मोठा छातीचा माणूस. त्यानं खूप शर्थीनं किल्ला लढवला.

पण मोजकं सामान. रसद बंद झाली.

मग शेवटी मुरारबाजी स्वतः दो दो हाती तरवारी घेऊन तुटून पडला मोगलांवर. पार पिटून घातले मोगल. थेट दिलेरखानाच्या तंबूपर्यंत. अगदी खानाच्या अंगावरही एक वार केलान् मुरारबाजीनं ! खान मागं सरला. मुरारबाजीची ढाल तुटली. त्यानं शेला हाताला गुंडाळला, अन् त्यावर घाव झेलायला लागला ! एवढ्यात खानानं लांबून एक धारदार बाण मारला. मुरारबाजीचं डोकं उडालं ! पण नुसतं धडच लढत राहिलं ! असा बहाद्दराचा पराक्रम !

शेवटी पुरंदरही जाणार असं शिवबाला कळलं. तेव्हा त्यानं ठरवलंन्, प्रत्येक वेळी तरवार चालवून भागत नाही. कधी कधी ढाल फेकून पळूनही जावं लागतं ! त्यानं जयसिंहाला पत्र पाठवलंन् : "तू रजपूत, मी मराठा. आपण दोघेही हिंदू. बादशहा तुला फसवतोय. भल्या माणसा, आपल्यासाठी दख्खन जिंकायला यायचं होतंस. मग मी

तुझा शिलेदार झालो असतो ! पण औरंगजेबासाठी आलास! तुझी भेट घ्यायची आहे मला ! ”

जयसिंहानं शिवरायाला बोलावलंन्. दोघांची भेट झाली. जयसिंहावर शिवरायानं छाप पाडली. शिवरायाला कैद करायचा मोगलांचा बेत होता. तो शिवरायानं पार विरघळवून टाकला. मग त्या दोघांच्या भेटीत काय ठरलं कोण जाणे ! जयसिंहानं बादशहाला पत्र घातलंन् :

“ शिवाजी फार मऊ आला. बारा किल्ले आपल्याकडे ठेवून बाकी सगळे तो आपल्याला देतो. आग्र्याला येतो म्हणतो. मला वाटतं, येऊ द्यावं. संभाजीला पाच हजारांची मनसबदारी द्यावी. शिवाजीला सेवेत घ्यावं. ”

शिवरायानं सगळा बंदोबस्त केला. आपल्या मागं कुणी काय काय करायचं ते ठरवून टाकलं. आईसाहेबांच्या पायांवर डोकं ठेवलं. संभाजीला बरोबर घेतलं. शिवरायांची स्वारी निघाली आग्र्याकडे.

## आग्र्याहून सुटका

औरंगजेबाचा दरबार भरलाय्. खूप थाटमाट केलाय्. सगळे सरदार आहेत. त्यांचे भरजरी कपडे. किनखापी पडदे. काश्मिरी गालिचे. पहारेकरी उभे आहेत. हाती नागव्या तरवारी. बाहेर तोफा ठेवलेल्या आहेत. भालाईत भाला घेऊन उभे आहेत.

औरंगजेब येऊन तख्तावर बसला. कावऱ्या बावऱ्या नजरेनं इकडे तिकडे पाहिलंन्. रामसिहानं बंदगी केली. म्हणाला,

" शिवाजी राजे आले आहेत !"

" हजर करा !"

शिवबा आले. छाती काढून आले. सिंहासारखी चाल. तरवारीच्या मुठीवर हात. रामसिंह म्हणाला,

" कुर्निसात करा."

शिवरायानं औरंगजेबाकडे पाहिलं. नजर रोखून. जिजामातेचे स्मरण करून मान लववली. औरंगजेबानं खूण केली. रामसिहानं शिवरायाला पंचहजारी मनसबदारांत उभं केलं. शिवराय संतापून म्हणाले, " हे माझ्या पुढे कोण उभे आहेत ?"

" जसवंतसिह."

" माझ्या फौजेनं याला पळवून लावलं ! तो माझ्यापुढं उभा ? अपमान आहे हा माझा !"

सगळा दरबार गडबडला. औरंगजेबानं घाईघाईनं शिवरायांना घेऊन जायला सांगितलं. अन् दरबार बरखास्त केला !

शिवराय रामसिंहाच्या वाड्यात परतले. मागोमाग औरंगजेबाचे पहारेकरी वाड्याभोवती बसले ! सिंह कैद झाला !

मग शिवरायांनी परत जाण्यासाठी नाना परी केल्या. पण औरंगजेब काही ऐकेना. पहारा अधिक कडक झाला! शेवटी शिवरायांनी लिहून धाडलं :

" माझी माणसं तरी परत जाऊ द्या ! "

औरंगजेबाला वाटलं, हे बरं होईल. त्यानं मोठ्या खुशीनं परवानगी दिली. शिवराय, संभाजी, हिरोजी फर्जंद, मदारी मेहतर असे सातआठ जण राहिले.

मग शिवराय आजारी पडले ! बरं वाटावं म्हणून त्यांनी फकिरांना मिठाई वाटायला सुरुवात केली. अगोदर पहारेकरी मिठाईचे पेटारे तपाशीत. पण मग त्यांनी तपासणं बंद केलं.

एका सकाळी मदारी मेहतर पहारेकऱ्यांना म्हणाला,

" गडबड करू नका. महाराज जास्त आजारी आहेत."

त्यांनी आत डोकावून पाहिलं. महाराज तोंडावर पांघरूण घेऊन झोपलेले दिसले त्यांना. हात बाहेर होता. त्यात महाराज घालीत ती आंगठी होती. थोड्या वेळानं हिरोजी अन् मदारी दोघे बाहेर पडले. पहारेकऱ्यांना म्हणाले,

" महाराजांचं जास्त आहे. हकीमाला बोलावून आणतो. "

ते जे गेले ते परत येताहेत कशाला ? बऱ्याच वेळानं पहारेकऱ्यांनी आत डोकावून पाहिलं. आत कोणी नव्हतं! महाराज अन् संभाजी–दोघेही मिठाईच्या पेटाऱ्यांतून पसार झाले होते !

औरंगजेबाला कळलं ; तेव्हा केस ओरबाडीत तो ओरडला

" कसा पळाला ? पकडा त्याला ! "

आता काय पकडा ! पक्षी उडाला !

# गड आला पण सिंह गेला

शिवराय आग्ऱ्याहून निसटले ते मथुरा, काशी, गया अशी तीर्थं करीत बैराग्याच्या वेषानं रायगडावर आले. मातुश्रींनी ओळखलं. कडकडून मिठी मारली. आंसवांनी न्हाऊ माखू घातलं. चहूंकडे आनंदीआनंद झाला. गडावरून तोफा वाजायला लागल्या, लोकांना गूळसाखरा वाटल्या.

शिवराय तर आले. पण गेलेले किल्ले ? तेही परत यायला हवेत !

हळूहळू, युक्तीयुक्तीनं बाकीचे किल्ले परत घेतले. पण कोंडाणा ? तो तर मोक्याचा किल्ला ! परत घेतलाच पाहिजे तो ! कुणी घ्यायचा ? कोण असा बहाद्दर आहे ?

तानाजी मालुसरे आले गडावर. आपल्या लेकाच्या लग्नाचं आमंत्रण द्यायला. त्यांनी हे ऐकले. लगेच ते म्हणाले,

"हात्तिच्या ! एवढंच ना ? मी जातो कोंडाणा घ्यायला!"

"तानाजी, अरे तुझ्या मुलाचं लगीन–"

"आधी लगीन कोंडाण्याचं, मग माझ्या रायबाचं !"

कुरकुरत राजांनी परवानगी दिली.

गडावर उदेभान नावाचा रजपूत किल्लेदार. मोठा शूर. त्याच्याजवळ रजपूत अन् पठाणांची फौज. पण तानाजीनं रात्री घोरपड लावली किल्ल्याला ! बहाद्दर वर चढून गेला! बरोबर अडीचशे मावळे. कापाकापी करीत त्याने कल्याण

दरवाजा उघडून दिला. सूर्याजी मालुसरा हजार दोन हजार मावळे घेऊन त्या वाटेनं घुसला. गडावर एकच गडबड. किल्लेदार स्वतः हाती पट्टा चढवून आला. तानाजीची त्याची गाठ पडली. दोघेही शर्थीनं झुंजले अन् दोघेही एकमेकांच्या वारांनी पडले !

गड आला–पण–सिंह गेला !

## राज्याभिषेक

औरंगजेब भेदरून शिवबाचं नाव घेईना. आदिलशाहीशी दोस्ती झाली. सगळे लोक धाक मानायला लागले. पण एवढ्यानं झालं का ? नाही झालं. शिवबाला दाखवायचं होतं, या देशात हिंदूंचंच राज्य असायला हवं. तेच इथले राजे. तेच या देशाचे स्वामी. दुसरा कोणीही नाही ! म्हणून मग शिवबानं एक कौतुक केलंन्, जे कोणी केलं नाही ते केलंन्!

त्यानं राज्याभिषेक करून घ्यायचं ठरवलंन् !

शिवबानं तोंडातून राज्याभिषेकाचं नाव काढायचा अवकाश. लगेच माणसं धावायला लागली. रायगड राजधानी ठरली. काशीहून गागाभट्ट आले. त्यांनी तिथी ठरवली.

ज्येष्ठ शु. १३ शके १५९६, दि. ५-५-१६७४ हा दिवस.

माणसं जमायला लागली. आईसाहेब पाचाडला राहात. त्या आल्या. स्वामी रामदास आले. जेधे, मोरे, पासलकर, मालुसरे, घाटगे, निंबाळकर, सावंत, मोहिते, शिर्के, चव्हाण, शिंदे, गायकवाड, काळे, पालकर, दाभाडे, ढमाले, गराडे– नावं किती म्हणून सांगू !

आदिलशाहीचा वकील आला. गोवळकोंड्याचा वकील आला. इंग्रजांचा वकील आला.

साता समुद्रांचं पाणी, सात नद्यांचं पाणी, पवित्र तीर्थांचं पाणी, कुरुक्षेत्रातील माती, हे सगळं गोळा झालं. उंबराच्या लाकडांचं आसन, त्यावर सोन्याचं सिंहासन, समोर सोन्याचा तराजू, सिंहासनाला हिरे, पाचू, माणकं, मोती.

ज्येष्ठ शु. ६ ला राजांची मुंज झाली. प्रायश्चित्तं झाली. होम झाले. हवनं झाली.

मुहूर्ताची तिथी उजाडली !

दरबारापुढच्या नगारखान्यात नगारा दुमदुमायला लागला. हत्ती झुंजायला लागले. घोडे फुरफुरायला लागले. दरबार माणसांनी खच्चून भरला. अष्टप्रधान आपापल्या जागी उभे राहिले. शिवरायांनी मातुश्रीला नमस्कार केला. श्रीसमर्थांची पायधूळ घेतली अन् नेमलेल्या मुहूर्तावर अगोदर सिंहासनावर भवानी तलवार ठेवली. मग आपण बसले !

गागाभट्टांनी पवित्र पाण्यानं अभिषेक केला. मंत्रघोष झाला. तोफा गडगडल्या. बंदुका सुटल्या. शहाजणं वाजायला लागली. महाराष्ट्राला राजा मिळाला ! खूप वर्षांनी!

शिवरायांनी ब्रीद धारण केलं—क्षत्रियकुलावतंस सिंहासनाधीश्वर गोब्राह्मणप्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज ! त्यांची मुद्रा सुरू झाली. ती पत्रावर उठवायची.

प्रतिपच्चन्द्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववन्दिता ।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥

अभिषेक झाल्यावर राजांनी जगदीश्वराचं दर्शन घेतलं. सुवर्णतुला केली. राजांचं वजन सोन्याचे सोळा हजार होन. ते सगळं सोनं ब्राह्मणांना वाटून दिलं. गागाभट्टांना खूप दक्षिणा दिली. गोरगरीब तर किती दिवस जेवत होते रायगडावर ! असा मोठा छान समारंभ झाला !

# सूर्य मावळला

अभिषेक झाला, अन् शिवराय स्वस्थ बसले का ?

नाही. त्यातून मोकळे झाले, अन् ते दक्षिणेत निघाले. तंजावरला त्यांचा सावत्र भाऊ व्यंकोजी होता. शहाजीराजांची जहागीर सांभाळीत होता तो. त्यांच्याकडे निघाले शिवछत्रपती. वाटेत गोवळकोंड्याच्या बादशहाशी दोस्ती केली. दक्षिणेतले खूप किल्ले घेतले. व्यंकोजीला समजावून त्याला आपलंसं केलं.

पण संभाजी ? त्याला महाराजांची शिस्त आवडेना. एकदा तर तो मोगलांना मिळाला. तिथून महाराजांनी त्याला परत आणलं. पन्हाळगडावर बापलेक महिनाभर राहिले. पण संभाजीची समजूत पटेना !

छत्रपती खिन्न झाले. मासाहेब राज्याभिषेक झाल्यावर दहाबारा दिवसांनी वारल्या. ते एक दुःख, आणखी ही एक काळजी.

ते परत रायगडावर निघाले. वाटेत सज्जनगडावर रामदासस्वामी ! दोघे गुरुशिष्य भेटले. समर्थांनी उपदेश करून समाधान केलं. अन् मग छत्रपती रायगडावर आले.

सगळी निरवानिरव केली. राज्याची व्यवस्था लावल. मरण जवळ आलं, हे ओळखलं !

शके १८०२ ची चैत्र शुद्ध पौर्णिमा. दुपारी सूर्य डोईवर चढला. राजांनी गंगाजळ मागितलं. ते प्राशन केलं. राम राम म्हटलं. अन् देह ठेवला.

जगदीश्वराजवळ राजांचं दहन झालं. राजांचा एक कुत्रा होता. वाघ्या त्याचं नांव. त्यानं चितेत उडी घेतली! [illegible]

गडे हो ! भूषण कवी म्हणतो,

काशी की कला जाती मथुरामें मसजिद वसती
अगर शिवाजी न होते, तो सुन्नत सबकी होती !

काशीचे धिडवडे निघाले असते. मथुरेत मशीद झाली असती. शिवराय नसते, तर सगळ्यांची सुंता झाली असती.

शिवराय फार मोठे !

कल्याणच्या सुभेदाराची देखणी सून ! कैद होऊन आली. शिवराय म्हणाले, " आमच्या आईसाहेब अशा सुंदर असत्या तर आम्ही ही असेच सुंदर झालो असतो !

शिवराय ! जय शिवराय !

फार मोठे होते, ... जय भारतमाता

जय महाराष्ट्र

वाचनालय शाखा
विभाग.
वा. क्र. [illegible] विषय
दिनांक [illegible] क्र.
BVBK-0400370